भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७०१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/१०/२०१७

**१) विवाहितेचा शारीरीक व मानसीक छळ केल्याने गुन्हा नोंद:—**

सन २०१३ पासुन यातील फिर्यादीचे लग्न झाल्यापासुन १ वर्षानी सन २०१३ पासुन तिचे पती आरोपी क्र. ०१ व आरोपी क्र. २, ३ सासु ,सासरे असुन यांनी फिर्यादीचा मानसिक व शारीरीक छळ केला असुन, यापुर्वी सहयोग महिला समुपदेशक केंद्र येथे फिर्यादीचे प्रकरणामध्ये समझोता झाला. परंतु फिर्यादीस सासरच्या लोंकानी जास्त छळ केल्यामुळे व फिर्यादीला कुठल्याही प्रकारची तडजोड करायची इच्छा नसल्याने,फिर्यादी हिचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४९८(अ) ३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. दुगावकर पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**२) धार्मीक भावना दुखावल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/१०/२०१७ चे १८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे वडीलोपार्जीत श्रद्धास्थान वलीशा बाबा फरीद यातील चबुत्र्याची यातील आरोपीतांनी परमात्मा एक सेवक धर्म स्विकरल्याने व नाशधुस करून त्याचे धार्मीक भावना दुखावल्याने फिर्यादी देवदास गंगाराम कोहळे वय ५० वर्ष रा. चांदपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २९४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ.उईके पो.स्टे सिहोरा हे करीत आहेत.

**३) अज्ञात वाहनाच्या धडकेत एक गंभिर जखमी:—**

दिनांक १०/१०/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील जखमी मोतीराम बकाराम नेवारे वय ५९ वर्ष रा. भिलेवाडा हा कारधा वरून भिलेवाडा कडे पायी येत असतांना यातील अज्ञात आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने , निष्काळजीपने चालवुन जखमी यास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने, व अपघाताची सुचना न देता पडुन गेल्याने, जखमीचे मुलाचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १८४,१३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनघटे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**४) नगदी पैसे व सोन्याच्या दागिन्याची चोरी :—**

दिनांक ०९/१०/२०१७ चे १२.०० ते १०/१०/२०१७ चे ०४.०० वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराच्या मागील दाराची कडी खोलुन आत प्रवेश करून आलमारीत ठेवलेले नगदी ३०,०००/रु व सोन्याच्या बिन्या ०२ मी.ली ग्रॅम कि. ४,०००/रु असा एकुन ३४,०००/रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी श्रीमती सुमन राकेश शेंद्रे वय ५० वर्ष रा. कस्तुरबा गांधीवार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी चाबुकस्वार पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**५) मोटार सायकलची चोरी :—**

दिनांक १०/१०/२०१७ चे १८.०० ते १८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची हिरो होंन्डा स्प्लेंडर प्रो. मोटार सायकल क्र. एमएच ३६ आर १५७९ कि. २५,०००/रु ची सामान्य रूग्नालय भंडाराचे परीसरात ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने, फिर्यादी हेमराज कचरू दहिवले वय ५५ वर्ष रा. गुजराथी कॉलोनी भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**६) नगदी पैसे चोरून नेल्याने गुन्हा नोंद;—**

दिनांक १०/१०/२०१७ चे १४.३० ते १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे बॅक ऑफ महाराष्ट्र गणेपुर येथे पैसे जमा करण्यास गेले असता, आरोपीने पैशाच्या नोटाचे बंडलाचे रबर व्यवस्थीत लावले नाही, असे म्हणुन बंडलाला हात लावुन त्यातील नगदी ५००/रु च्या १९ नोटा असे एकुन ९,५००/रु चोरून नेल्याने फिर्यादी नरहरी सदाशिव हरडे वय ७६ वर्ष रा. राजेन्द वार्ड गणेशपुर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**७) वाहन सार्वजनीक ठिकाणी थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १०/१०/२०१७ चे १६.३० ते १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाच्या जिवीतास अडथळा तसेच धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन ~~सिहोरा~~ साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**८) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद;—**

दिनांक १०/१०/२०१७ चे १८.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्याती ट्रक क्र. एमएच ४६ एमएफ ६१२७ हा दारू पिवुन दारूचे नशेत चालवितंनी मिळुन आल्याने, त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे चेक केले असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. चामलाटे वा.नि.शा. भंडारा यांचे रिपोर्ट वरू पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोना. राठोड पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**९) विहीरीच्या पाण्यात उडी घेवुन तरूनीचा मृत्यु. :—**

दिनांक १०/१०/२०१७ चे १२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीने मृतक कु. मिनाक्षी रामदास मेश्राम वय २१ वर्ष रा. घाटकुरोडा ता. तिरोडा जि. गोंदीया हिचे डोके दुखत असल्याने दि १०/१०/२०१७ ला ०९.३० वा. दरम्यान औषधोपचारा करीता भंडारा येथील डॉ. आनंदकुमार यांचेकडे आनले व उपचार करून झाल्यावर मोठया मुलीची भेट घेण्याकरीता सुरेवाडा येथे गेले असता, मृतकने वडीलांची नजर चुकवुन १२.३० वा. चंद्रभान कान्हेकर यांचे घरघुती विहीरीत उडी घेवुन मरण पावल्याने फिर्यादी रामदास मारोती मेश्राम वय ६२ वर्ष, रा.. घाटकुरोडा ता. तिरोडा जि. गोंदीया यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील पोउपनी लाडे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**१०) अवैध दारू /जुगार अंडयावर धाडी . :—**

दिनांक ११/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा,व तुमसर, येथे अवैध दारू अंडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून १८ लिटर हातभट्टी किंमती १८.००/—रु, तसेच जुगारातुन ५६२ कि. असा एकुण २,३६२/रु चा माल जप्त करण्यात आला.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ११/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०८ तीन सिटर वाहनांवरती, १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १२० केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता